# व्हीओआयपी कॉल
# मागणाऱ्या आंतरराज्य टोळीचा पर्दाफाश



**नांदेड :** सीमबॉक्स कार्यप्रणालीद्वारे समांतर टेलिकॉम एक्स्चेंज चालवत अनधिकृतपणे व्हीओआयपी कॉल करून खंडणीची मागणी करणारी आंतरराज्य टोळी पकडण्यात नांदेड पोलिसांना यश आले. जिल्ह्यातील एका व्यापाऱ्याला वेगवेगळ्या मोबाइल क्रमांकावरून एक व्यक्ती कॉल करून खंडणीची मागणी करीत त्रास देत होती. नंतर सदर व्यापाऱ्याने पोलिसांत तक्रार दिली. एक व्यक्ती वेगवेगळ्या क्रमांकावरून कॉल करून खंडणीची मागणी करीत असल्याचे त्यात त्याने नमूद केले होते. तक्रार दिल्यानंतर या प्रकरणाचे गांभीर्य व गुंतागुंत लक्षात आल्यावर अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, शहर पोलीस उपाधीक्षक सूरज गुरव यांच्या नेतृत्वात विशेष पथक तपास करीत होते.

सदर मोबाइल क्रमाकांचे तांत्रिक विश्लेषण केल्यानंतर सदर मोबाइल क्रमांक हे सीमबॉक्सचा वापर करून व्हीओआयपी कॉलद्वारे कॉल करीत होते व सदर सीमबॉक्समध्ये प्रिपेड कार्डचा वापर करण्यात आला. त्या सीमबॉक्सचे लोकेशन कर्नाटकातील दांडेली येथे असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार विशेष पथकाने आरोपी सियाबुद्धीन पि. अब्दुल रहेमान, जयेश अशोक बेटकर, (दोघे रा. दांडेली, ता. दांडेली, जि. कारवार कर्नाटक) व राशीद अब्दुल अजित नोट्टानवीडन (रा. कटाडी मोतेडम, पोस्ट ईडककरा, ता. निलंबूर, जि. मल्लपुरम, केरळ) यांना पकडले. या आरोपींकडून १० सीमबॉक्स, १२४४ सीमकार्ड, ५ राऊटर, लॅपटॉप व इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. सदर आरोपी हे एअरटेल कंपनीच्या सीमकार्डचा गैरवापर करून आंतरराष्ट्रीय कॉल ॲप/सॉफ्टवेअरद्वारे व्हीओआयपीचे जीएसएममध्ये रूपांतर करून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वापर करीत होते. सदर आरोपी हे इतक्या मोठ्या प्रमाणात सीमकार्ड का वापरत होते याबाबत तपास सुरू आहे.

**व्यापाऱ्याला खंडणीसाठी देत होते त्रास**

**विशेष पथकाची कारवाई**

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, खंडेराय धरणे, शहर उपाधीक्षक सूरज गुरव, कंधारचे उपविभागीय पोलीस अधिकारी मारुती थोरात, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर, कंधारचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि चंद्रकांत पवार, आदित्य लोणीकर, आर्थिक गुन्हे शाखेचे सपोनि राजेश आलेवार, सपोनि राम केंद्रे, उपनिरीक्षक दशरथ आडे, उपनिरीक्षक दत्ता काळे, गजानन दळवी, प्रकाश टाकरस, नदीम यांच्या पथकाने केली. जिल्ह्यातील कुणालाही धमकी, खंडणीचे कॉल आल्यास पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस अधीक्षकांनी केले आहे.

दै. प्रजावाणी दि. 18/10/2023

# सिमबॉक्स कार्यप्रणालीव्दारे समांतर टेलिकॉम एक्सचेंज चालविणारी अंतरराज्य टोळी जेरबंद!

**कंधारच्या व्यापाऱ्याला मागितली होती खंडणी**



नांदेड, दि. १७ : सिमबॉक्स कार्यप्रणालीद्वारे समांतर टेलिकॉम एक्सचेंज चालवून खंडणी मागणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीतील तीन जणांना नांदेड पोलिसांनी जेरबंद केले. नांदेड पोलिसांची ही फार मोठी उपलब्धी मानली जाते. या टोळीकडून कंधारच्या एका व्यापाऱ्याला खंडणी मागण्यात आली होती.

उपविभागीय पोलीस अधिकारी सुरज गुरव यांच्या अधिपत्याखाली विशेष पथके तयार करण्यात आली. या घटनेचा तपास केल्यानंतर वेगवेगळे मोबाईल क्रमांक सिमबॉक्सचा वापर करुन अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कॉल करण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले.

पान २ वर